# देगलूरमध्ये १९ पासून राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे राष्ट्रीय अधिवेशन

**देगलूर / प्रतिनिधी**

येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालय राज्यशास्त्र विभाग व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड आणि महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोक प्रशासन परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे ४०वे राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. देगलूर महाविद्यालयात दि.१९ व २० जानेवारी रोजी होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनाचा विषय ₹लोकशाहीतील संक्रमण₹ हा आहे.

या अधिवेशनाचे उद्घाटक राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर, संमेलनाध्यक्ष डॉ विलास आघाव यांचे बीज भाषण होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ.किरणकुमार बोंद. ,अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे अध्यक्ष डॉ. संजय वाघ, सचिव डॉ. संभाजी पाटील, विचारमंथन संशोधन पत्रिकेचे संपादक डॉ प्रमोद पवार, डॉ. मनोहर पाटील व परिषदेचे सर्व उपाध्यक्ष यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

दि.१९ जानेवारी रोजी अधिवेशनाचे उद्घाटन तर दि. २० रोजी समारोप होणार आहे. या चर्चासत्रात डॉ.सर्जेराव शिंदे (चाकुर), डॉ. प्रशांत अमृतकर (अधिष्ठाता छत्रपती संभाजी नगर ) , डॉ. एम. आय. शेख (अध्यक्ष, लोकप्रशासन अभ्यास मंडळ , स्वा. रा .ती. मराठवाडा विद्यापीठ नांदेड) यांची उपस्थिती राहणार आहे या अधिवेशनात डॉ. अशोक चौसाळकर [कोल्हापूर], डॉ. अनिलकुमार हलु ( कलबर्गी, कर्नाटक) डॉ. सरोज पाटील (बल्लारी, कर्नाटक ) हे साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. दि. २० जानेवारी रोजी १० वाजता सकाळच्या सत्रात डॉ. पी.डी.देवरे यांचे डॉ. मोईन शाकीर ,डॉ बी. एल. भोळे, डॉ यशवंत सुमंत स्मृती व्याखयानमालेत व्याख्यान होणार आहे. या राष्ट्रीय अधिवेशनात सहभागी होवून संशोधन पर लेखाचे वाचन करणाऱ्या ०६ प्राध्यापकांना उत्कृष्ट लेख वाचन पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच डॉ. विठ्ठल मोरे यांच्या स्मृतीत संशोधक व पदव्यूत्तर वर्गातील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट पेपर वाचन पुरस्कार दिला जाणार आहे. या अधिवेशनासाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्या असून तयारी पूर्णतेकडे आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी दिली. महाराष्ट्र व देशभरातील राज्यशास्त्र व लोकप्रशासन विषयाच्या प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांनी या अधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य खताळ, संयोजक प्रा.डॉ. रत्नाकर लक्षटे , सहसंयोजक प्रा. डॉ.माधव चोले, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या अधिवेशनाच्या तयारीत व्यस्त आहेत.

चतुर्थ पुण्यस्मरण

Scanned with OKEN Scanner